॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥
'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)
# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव
Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

## जनसंपर्क विभाग

जळगाव, दि. १३ (प्रतीनिधी) :- यापुढच्या काळात नाविन्यपूर्ण कल्पनाच महत्त्वाच्या ठरणार असून त्या जोरावर बौध्दीक संपदा हक्क प्राप्त करण्याचा प्रयत्न तरुण पिढीने करुन देशाच्या विकासात योगदान द्यावे अशी अपेक्षा कुलगुरू प्रा. व्ही.एल.माहेश्वरी यांनी व्यक्त केली.

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचा बौध्दीक संपदा अधिकार कक्ष आणि रासायनिकशास्त्र प्रशाळा व विद्यापीठाचे नव उद्योजकता केंद्र यांच्या वतीने आज बुधवार दि. १३ मार्च रोजी "बौध्दीक संपदा अधिकारांचे संवेदनीकरण" या विषयावर कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. या कार्यशाळेचे उद्घाटन करतांना प्रा.माहेश्वरी बोलत होते. यावेळी मंचावर पुणे येथील लिडेनफ्रॉस्ट इनोव्हेशन प्रा.लि.चे अविष्कार सल्लागार आशुतोष प्रचंड, आय.पी.आर. चेअर प्रोफेसर डॉ.डी.जी.हुंडीवाले, वित्त व लेखाधिकारी सीए. रवींद्र पाटील, समन्वयक प्रा.विकास गीते, डॉ.राजेश जवळेकर, प्रा.डी.एच.मोरे, प्रा. भुषण चौधरी उपस्थित होते.

प्रा.माहेश्वरी म्हणाले की डेटा हा शब्द आता महत्वाचा ठरला आहे. डेटा ही मालमत्ता असून ज्या देशांमध्ये डेटा अधिक आहे ते श्रीमंत समजले जातात. बौध्दीक संपदा हक्क आता धोरणात्मक संसाधन ठरले असून तरूणांनी नावीन्यपूर्ण संकल्पनांचा शोध घेऊन बौध्दीक संपदा हक्क प्राप्त करण्यासाठी प्रयत्नशील रहावे. या संपदेची व्यावसायिक किमंत काय आहे हे पहावे. भारतात केवळ ९० हजार पेटंट फाईल होतात. त्यांची संख्या वाढायला हवी त्यासाठी तरुणांनी नावीन्यपूर्ण संकल्पनांची सख्या वाढवण्याचे आवाहन त्यांनी केले.

आशुतोष प्रचंड यांनी बौध्दीक नवकल्पना आणि शोध प्रक्रिया या विषयावर मांडणी केली. नावीन्यपूर्ण कल्पना कशा असाव्यात, त्याचे पेटंट कसे मिळवता येईल त्यातून व्यावसायीक दृष्टया कसा पैसा कमवता येईल आणि त्यासाठी स्ट्रक्चरल विचार कसे करावेत याची माहिती दिली. पेटंट मुळे स्वत:ची ओळख निर्माण होते. उद्योग जगतात मोठी संधी मिळते असेही ते म्हणाले. प्रारंभी डॉ. विकास गीते यांनी प्रास्ताविक केले. डॉ.हुंडीवाले यांनी आयपीआर चेअर विषयी माहिती दिली. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन डॉ.सारंग बारी यांनी केले. या दिवसभराच्या कार्यशाळेत प्रा.भुषण चौधरी, डॉ.विकास गीते, डॉ. रवींद्र धीवरे यांनी पेटंट विषयी मार्गदर्शन केले. या कार्यशाळेत १३० विद्यार्थी सहभागी झाले होते.

.................................................................................................................................

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२४ दिनांक: १३ मार्च, २०२४

प्रति,
मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी